आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 16/09/2026 METRO CITY VRUTANT

> संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 196 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# सरकारच्या 25 लोकप्रिय योजनांचे होणार मूल्यांकन

## 'महा-टॅक'ची स्थापना; आयआयएम मुंबईसह माजी सनदी अधिकाऱ्यांच्या संस्थेची घेणार मदत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांवर दरवर्षी हजारो कोटी रुपये खर्च केले जातात. या योजनांचा नेमका किती लाभ नागरिकांपर्यंत पोहोचतो आणि अपेक्षित उद्दिष्ट साध्य होते का, याची तपासणी आता केली जाणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी, प्रधानमंत्री आवास योजना, मनरेगा, जल जीवन मिशन आणि आयुष्मान भारत यांसह सरकारच्या 25 लोकप्रिय योजना आणि 25 प्रमुख धोरणांच्या परिणामकारकतेचे मूल्यांकन करण्यात येणार आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत योजनांच्या मूल्यांकनासाठी 'महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष' (महा-टॅक) स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. हा कक्ष मुख्यमंत्री कार्यालयाच्या देखरेखीखाली कार्यरत राहणार आहे.

सरकारकडून विविध योजनांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जात असला, तरी या योजनांमधून प्रत्यक्षात अपेक्षित उद्दिष्ट साध्य होते की नाही, याचा नियमित आढावा घेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध नव्हती. त्यामुळे योजनांची परिणामकारकता निश्चित करणे अडचणीचे ठरत होते. आता महा-टॅकच्या माध्यमातून योजनांचे पद्धतशीर मूल्यांकन केले जाणार आहे.

या कामासाठी आयआयएम मुंबई तसेच सेंट्रल फॉर रिसर्च इन स्कीम्स अँड पॉलिसीज् या माजी सनदी अधिकाऱ्यांच्या संस्थेची मदत घेतली जाणार आहे.

योजनांची अंमलबजावणी सुरु असतानाच त्यांचे समांतर मूल्यांकन करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे अंमलबजावणीत आढळणाऱ्या त्रुटी तातडीने दूर करून योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे शक्य होणार आहे.

महा-टॅक आणि मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे. तसेच विविध धोरणांच्या मूल्यांकनासाठी 13 समित्या स्थापन करण्यात येणार आहेत. त्यामुळे सरकारी योजना आणि धोरणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी, त्याचा लाभ आणि अपेक्षित परिणाम यांचा सविस्तर आढावा घेण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

# जरांगे पाटलांनी गणेशोत्सवात मुंबई आंदोलनाचा हट्ट सोडावा : देवेंद्र फडणवीस

## मराठा समाजाच्या 13 पैकी 12 मागण्या सरकारने मान्य केल्याचा दावा
## गणेशोत्सवाच्या काळात कायदा-सुव्यवस्था राखण्याचे आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : मराठा समाजाच्या 13 मागण्यांपैकी 12 मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. त्यामुळे सध्या सुरु असलेल्या गणेशोत्सवात जनतेला त्रास होऊ नये, यासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी मुंबईत आंदोलन करण्याचा हट्ट सोडावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**



न्यायालयाच्या कचाट्यात अडकणाऱ्या मागण्यांमुळे अखेरीस मराठा समाजाचेच नुकसान होऊ शकते. त्यामुळे ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन सणासुदीच्या काळात जरांगे-पाटील यांनी समजूतदारपणा दाखवावा, असे फडणवीस यांनी सांगितले.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आक्रमक झालेल्या मनोज जरांगे-पाटील यांचा ताफा आंदोलनाच्या उद्देशाने मुंबईच्या दिशेने निघाला आहे. या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळ बैठकीत जरांगे-पाटील यांनी मुंबईत येऊ नये, याबाबत आवाहन करण्यास एकमत झाल्याची माहिती फडणवीस यांनी दिली.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही गणेशोत्सवाच्या काळात मुंबईतील नागरिक आणि भाविकांची गैरसोय होऊ नये, तसेच कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी जरांगे-पाटील यांनी मुंबईत येण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा, असे आवाहन केले आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही पोलिसांची जबाबदारी आहे. जरांगे-पाटील यांनी यापूर्वी आंदोलनासाठी दिलेला अर्ज पोलिसांनी नाकारला होता. त्यानंतर त्यांनी पुन्हा एकदा अर्ज दिला असून, त्यावर पोलीस प्रशासन निर्णय घेईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुंबई आणि पुणे या दोन्ही शहरांमध्ये गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर आणि सार्वजनिक स्वरुपात साजरा केला जातो.

हिंदूंच्या प्रमुख सणांपैकी एक असलेल्या गणेशोत्सवाच्या काळात नागरिक आणि भाविकांची गैरसोय होऊ नये, याला प्राधान्य असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

जरांगे-पाटील यांनी यापूर्वीही आंदोलने केली आहेत आणि भविष्यातही ते आंदोलन करू शकतात. मात्र, सणासुदीच्या काळात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, यासाठी त्यांनी सध्याचा आंदोलनाचा निर्णय पुढे ढकलण्याचा विचार करावा, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# संदीप वाघेरे यांच्या विसर्जन केंद्रावर दीड दिवसांच्या गणरायाला भावपूर्ण निरोप

## सहा वर्षांची सेवा अखंडित; दोन विसर्जन हौदांसह नागरिकांसाठी विविध सुविधांची व्यवस्था

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : गणेशोत्सवातील दीड दिवसांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन पिंपरी येथे नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या गणेशमूर्ती विसर्जन व संकलन केंद्रावर भक्तीमय वातावरणात पार पडले. नागरिकांनी मोठ्या संख्येने या केंद्राचा वापर करुन आपल्या लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप दिला.**







गेल्या सहा वर्षांपासून संदीप वाघेरे यांच्या वतीने गणेशमूर्ती विसर्जन व संकलन केंद्राचा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. यंदाही नागरिकांना सुरक्षित, सुलभ आणि पर्यावरणपूरक विसर्जनाची सुविधा मिळावी, यासाठी केंद्रावर दोन स्वतंत्र विसर्जन हौद उभारण्यात आले आहेत. तसेच गणेशमूर्ती संकलनासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी आरतीची विशेष व्यवस्था, साउंड सिस्टीम, पिण्याचे स्वच्छ पाणी, पुरेशी प्रकाश व्यवस्था, स्वच्छता, निर्माल्य संकलन, कचरा संकलन तसेच दिशादर्शक फलकांची व्यवस्था करण्यात आली होती. गर्दीचे नियोजन आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी स्वयंसेवकांचीही नियुक्ती करण्यात आली होती.

दीड दिवसांच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनावेळी नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जनाला प्राधान्य दिले. ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांसह येणाऱ्या कुटुंबांना स्वयंसेवकांकडून आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे विसर्जन प्रक्रिया कोणतीही गैरसोय न होता शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली.

नागरिकांकडून संकलित करण्यात आलेल्या गणेशमूर्तींचे महापालिकेने निश्चित केलेल्या अधिकृत ठिकाणी शास्त्रोक्त पद्धतीने विसर्जन करण्यात येणार आहे. नदी, नाले किंवा अन्य जलस्रोतांमध्ये मूर्ती विसर्जित न करता संकलन केंद्राचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. "गणेश भक्तांच्या श्रद्धेचा सन्मान राखत सुरक्षित, सुलभ आणि पर्यावरणपूरक विसर्जनाची सुविधा उपलब्ध करुन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. गेल्या सहा वर्षांपासून हा उपक्रम अखंडितपणे सुरु असून, दीड दिवसांच्या गणरायाचे विसर्जन भक्तीमय वातावरणात पार पडले. आगामी विसर्जनाच्या दिवसांतही नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा," असे आवाहन नगरसेवक संदीप वाघेरे यांनी केले.

# थेरगाव हॉस्पिटलमध्ये इस्कॉनतर्फे सात्विक भोजन उपक्रम सुरू

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड :- थेरगाव येथील रुग्णालयात उपचार घेत असलेले रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी इस्कॉन संस्थेमार्फत सुरु करण्यात आलेल्या सात्विक भोजनाच्या (प्रसाद) उपक्रमाचा शुभारंभ पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला. आजारपण आणि संकटाच्या काळात रुग्णाला वैद्यकीय उपचारांसोबतच वेळेवर मिळणाऱ्या पौष्टिक आणि सात्विक आहाराची अत्यंत आवश्यकता असते, असे प्रतिपादन अभिषेक बारणे यांनी यावेळी केले.**





हा उपक्रम अधिक प्रभावीपणे आणि सातत्याने राबवण्यासाठी 'सीएसआर' फंडाचा उत्तम वापर करण्यात आला असून, या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत शहरातील आरोग्यसेवेला मोठा हातभार लागणार आहे. या निधीच्या योग्य नियोजनामुळे रुग्णालयातील रुग्णांच्या प्रकृतीची विशेष काळजी घेऊन, पूर्णपणे स्वच्छता व नियमांचे पालन करत हलका, ताजा आणि घरगुती पद्धतीचा सात्विक आहार उपलब्ध होणार आहे. तसेच, दूरवरून उपचारासाठी आलेल्या आणि आर्थिक अडचणीत असलेल्या रुग्णांच्या कुटुंबीयांना बाहेर जेवणासाठी वणवण फिरावे लागू नये, यासाठी हा उपक्रम अतिशय मोलाचा आधार ठरणार आहे. भगवंताचा हा पवित्र प्रसाद रुग्णांना मानसिक स्थैर्य आणि लवकर बरे होण्यासाठी आवश्यक असलेली सकारात्मक ऊर्जा प्रदान करेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

शहराच्या सर्वांगीण विकासासोबतच नागरिकांचे आरोग्य आणि सामाजिक स्वास्थ्य जपण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहेच, परंतु जेव्हा सीएसआर फंडाच्या माध्यमातून अशा लोककल्याणकारी उपक्रमांमध्ये धार्मिक व सामाजिक संस्था पुढे येतात, तेव्हा समाजसेवेचे काम अधिक व्यापक होते, असे सांगत स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी इस्कॉन संस्था, सीएसआर अंतर्गत सहकार्य करणाऱ्यांचे आणि निस्वार्थ भावनेने सेवा देणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.

"थेरगाव हॉस्पिटलमधील रुग्णांसाठी आणि त्यांच्यासोबत असणाऱ्या नातेवाईकांसाठी इस्कॉन संस्थेने सीएसआर फंडाच्या माध्यमातून सुरु केलेल्या सात्विक भोजनाच्या (प्रसाद) उपक्रमाचा शुभारंभ करताना मला आनंद आहे. आजारपणाच्या कठीण काळात जेव्हा रुग्णाला घरगुती आणि पौष्टिक आहाराची गरज असते, तेव्हा हा उपक्रम त्यांना मोठा मानसिक आणि शारीरिक आधार देणारा आहे. 'सेवा हीच ईश्वर सेवा' या भावनेतून चालविल्या जाणाऱ्या आणि सीएसआरच्या माध्यमातून बळकट होणाऱ्या अशा लोककल्याणकारी उपक्रमांना पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आणि माझ्या वैयक्तिक पातळीवरुन नेहमीच संपूर्ण सहकार्य व पाठबळ आहे."

**- अभिषेक बारणे, सभापती-**
**स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# अल्पसंख्याक समाजावर अन्याय करु नये राजकीय प्रतिनिधित्वाचा समान हक्क मिळालाच पाहिजे

## पुण्यात परिसीमन व मुस्लिम राजकीय प्रतिनिधित्वावर सखोल चर्चा; अब्दुर्रहमान (IPS) यांचे प्रतिपादन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : स्वातंत्र्यानंतरच्या भारताच्या लोकशाही प्रवासात प्रत्येक समाजाला समान राजकीय प्रतिनिधित्व मिळणे हा संविधानाने दिलेल्या लोकशाही मूल्यांचा महत्त्वाचा भाग आहे. मात्र मुस्लिम समाजाचे लोकसभा, राज्यसभा तसेच विविध लोकप्रतिनिधी संस्थांमधील प्रतिनिधित्व सातत्याने अपेक्षेपेक्षा कमी राहिल्याने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे, असे मत माजी आयपीएस अधिकारी अब्दुर्रहमान यांनी व्यक्त केले.**




मतदारसंघांची पुनर्रचना (परिसीमन), मुस्लिम समाजाचे राजकीय प्रतिनिधित्व आणि आगामी काळातील राजकीय परिस्थिती या विषयावर पुण्यात काल विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत पुण्यातील विविध राजकीय पक्षांचे आजी-माजी मुस्लिम नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय क्षेत्रात पुढे येण्याची इच्छा असलेले कार्यकर्ते तसेच मुस्लिम धर्मगुरु मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी अब्दुर्रहमान (IPS) यांनी मुस्लिम समाजाच्या कमी राजकीय प्रतिनिधित्वामागील विविध कारणांचे सविस्तर विश्लेषण केले.

त्यांनी सांगितले की, राजकीय पक्ष मुस्लिम समाजाला उमेदवारी देताना अनेकदा राजकीय गणितांचा विचार करतात. मुस्लिम उमेदवाराला उमेदवारी दिल्यास बिगर-मुस्लिम मतदार नाराज होतील, अशी भीती काही पक्षांच्या निर्णय प्रक्रियेत दिसून येते.

त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात उमेदवारी आणि प्रतिनिधित्व मिळत नाही. ही परिस्थिती लोकशाहीच्या प्रतिनिधित्वाच्या तत्त्वासाठी चिंताजनक आहे.

### मतांचे विभाजन हा देखील महत्त्वाचा मुद्दा

एका मतदारसंघातून अनेक मुस्लिम उमेदवार निवडणूक लढवित असतील तर मुस्लिम मतांचे विभाजन होण्याची शक्यता वाढते. त्याचा थेट परिणाम निवडणुकीच्या निकालावर होतो. त्यामुळे समाजाच्या राजकीय शक्तीचे रुपांतर प्रभावी प्रतिनिधित्वात होत नाही. 2014 च्या लोकसभा निवडणुकीतील उत्तर प्रदेश आणि बिहारमधील परिस्थितीचा संदर्भ देत या विषयाचा अभ्यास करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

### FPTP पद्धतीमुळे अल्पसंख्याकांचे प्रतिनिधित्व मर्यादित

भारतातील First-Past-the-Post (FPTP) निवडणूक पद्धतीमध्ये सर्वाधिक मते मिळविणारा उमेदवार विजयी होतो; त्याला एकूण मतांपैकी 50 टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळणे आवश्यक नसते. या पद्धतीचा परिणाम असा होऊ शकतो की समाजातील मोठ्या प्रमाणावर विखुरलेल्या मतदारांचे मतसंख्येत रुपांतर झाले तरी त्याचे पुरेसे प्रतिनिधित्व निवडून आलेल्या संस्थांमध्ये दिसून येत नाही.

अब्दुर्रहमान यांनी विशेषतः स्पष्ट केले की, धार्मिक, भाषिक, प्रादेशिक किंवा राजकीयदृष्ट्या लहान गटांना निवडणूक व्यवस्थेत योग्य प्रतिनिधित्व मिळण्यासाठी अधिक व्यापक विचार करण्याची आवश्यकता आहे.

### परिसीमन आणि आरक्षित मतदारसंघांचा प्रश्न

परिसीमनाच्या प्रक्रियेत मतदारसंघांच्या सीमा आणि लोकसंख्येचे स्वरूप बदलते. काही मतदारसंघ S C / S T आरक्षणासाठी राखीव असतात. मुस्लिमांची लक्षणीय लोकसंख्या असलेल्या काही मतदारसंघांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. SC/ST आरक्षणाचा उद्देश वंचित घटकांना राजकीय प्रतिनिधित्व देणे हा संविधानिकदृष्ट्या महत्त्वाचा उद्देश आहे; मात्र त्याच वेळी मुस्लिम समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वाच्या प्रश्नावरही स्वतंत्रपणे चर्चा होणे आवश्यक आहे, अशी भूमिका चर्चेत मांडण्यात आली.

### भौगोलिक विखुरलेपणामुळे राजकीय प्रभाव कमी

मुस्लिम समाजाची लोकसंख्या देशभर अनेक मतदारसंघांमध्ये विखुरलेली असल्यामुळे अनेक ठिकाणी मुस्लिम मतदारांची संख्या निर्णायक असली तरी स्वतंत्रपणे राजकीय प्रतिनिधी निवडून आणण्याइतकी एकत्रित नसते. त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात खासदार आणि आमदारांची संख्या निर्माण होत नाही.

या पार्श्वभूमीवर "मुस्लिम समाज हा कोणत्याही एका पक्षाची कायमस्वरुपी मतपेढी नसून, त्याला समान नागरिक म्हणून राजकीय प्रतिनिधित्व मिळणे हा त्याचा घटनात्मक अधिकार आहे," असा मुद्दा चर्चेत अधोरेखित करण्यात आला.

### धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली राजकीय उपेक्षा नको

कार्यक्रमात बोलताना अब्दुर्रहमान यांनी धर्मनिरपेक्षतेचा दावा करणाऱ्या राजकीय पक्षांनीही मुस्लिम समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वाकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता व्यक्त केली.

केवळ निवडणुकीच्या काळात अल्पसंख्याक समाजाच्या मतांचा विचार करुन नंतर त्यांना उमेदवारी आणि निर्णय प्रक्रियेत योग्य स्थान न देणे ही लोकशाहीच्या दृष्टीने विसंगती असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

"अल्पसंख्याक समाजावर अन्याय करु नये. मुस्लिम समाजाला दया किंवा उपकार म्हणून नव्हे, तर लोकशाहीतील समान हक्क म्हणून प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे," हा बैठकीचा प्रमुख सूर होता.

### राजकीय सहभाग वाढविण्याचे आवाहन

या बैठकीत मुस्लिम समाजाने केवळ निवडणुकीत मतदान करण्यापुरता राजकीय सहभाग मर्यादित न ठेवता, स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा, लोकसभा, राज्यसभा आणि धोरणनिर्मितीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढवावा, असे आवाहन करण्यात आले.

तसेच विविध राजकीय पक्षांनी मुस्लिम समाजातील सक्षम, शिक्षित, सामाजिक बांधिलकी असलेल्या आणि जनतेशी जोडलेल्या कार्यकर्त्यांना योग्य संधी देण्याची मागणी करण्यात आली.

पुण्यातील आजी-माजी नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, धर्मगुरु आणि राजकीय क्षेत्रात काम करु इच्छिणाऱ्या तरुणांनी एकत्र येऊन या



विषयावर सातत्याने अभ्यास, जनजागृती आणि घटनात्मक मार्गाने पाठपुरावा करण्याची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

लोकशाहीमध्ये संख्या महत्त्वाची असली तरी केवळ संख्या पुरेशी नसते; त्या संख्येला योग्य आणि प्रभावी प्रतिनिधित्व मिळणेही तितकेच आवश्यक आहे.

मुस्लिम समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न हा केवळ एका समाजाचा प्रश्न नसून भारतीय लोकशाही अधिक प्रतिनिधिक आणि समावेशक करण्याचा प्रश्न आहे.

अल्पसंख्याकांना न्याय, समान संधी आणि संविधानिक हक्कांचे संरक्षण मिळाले पाहिजे. कोणत्याही समाजावर अन्याय होऊ नये आणि प्रत्येक नागरिकाला लोकशाहीच्या निर्णयप्रक्रियेत समान स्थान मिळावे, हीच या चर्चेची प्रमुख भूमिका होती.

या चर्चासत्राला यशस्वी करण्यासाठी इकबाल शेख, अंजुम इनामदार, सुफियान कुरेशी, जुबेर मेमन, मुनव्वर कुरेशी, इक्बाल अन्सारी इत्यादी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 16/09/2026

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# अनुराधा मराठे यांचा संगीतसाधनेबद्दल पुणे फेस्टिव्हलतर्फे सत्कार

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पुणे : प्रख्यात मराठी सुगम संगीत गायिका अनुराधा मराठे यांच्या वयाची 75 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पुणे फेस्टिव्हलतर्फे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते मंगळवारी पत्रकार भवन, नवी पेठ येथे हा सत्कार झाला. यावेळी पुणे फेस्टिव्हलचे जनरल सेक्रेटरी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, मुख्य संयोजक ॲड. अभय छाजेड, नगरसेवक सुनील शिंदे, मोहन टिल्लू आदी उपस्थित होते. यानिमित्ताने ज्येष्ठ निवेदिका मंजिरी धामणकर यांनी अनुराधा मराठे यांच्या प्रदीर्घ संगीत प्रवासावर आधारित प्रकट मुलाखत घेतली.**



कार्यक्रमाची सुरुवात तन्मयी मेहेंदळे-कुलकर्णी यांनी यमन रागातील गणेशस्तवनाने केली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल म्हणाले, "38व्या पुणे फेस्टिव्हलची दिमाखदार सुरुवात झाली आहे. अनुराधा मराठे यांचा सत्कार म्हणजे अखंड संगीतसाधनेचा सन्मान आहे. कलाकाराचा सन्मान हा केवळ त्या कलाकाराचा नसून संपूर्ण संगीत क्षेत्राचा सन्मान असतो. वय वाढते तसे कलाकाराची कला अनुभवातून अधिक समृद्ध होत जाते."

त्यानंतर अनुराधा मराठे यांनी आपल्या संगीत कारकिर्दीतील आठवणींना उजाळा देताना गुरु, कुटुंब आणि दिग्गज संगीतकारांकडून मिळालेल्या संस्कारांमुळे आपली जडणघडण झाल्याचे सांगितले. मराठे म्हणाल्या, "माझ्या आई-वडिलांना गायनाची आवड होती. वडिलांच्या राष्ट्र सेवा दलाच्या कार्यामुळे आम्ही धुळ्यात स्थायिक झालो. वयाच्या सातव्या वर्षी डॉ. श्रीपाद नाईक यांच्याकडे पाच रुपये फी देऊन गायन शिकण्यास सुरुवात केली. मात्र, एका वर्षाने कुटुंबाच्या आग्रहामुळे गायन थांबले. त्यानंतर माझे गुरु स्वतः घरी आले आणि पुन्हा मला गायनासाठी घेऊन गेले. पुढे त्यांनी तब्बल 17 वर्षे कोणतीही फी न घेता मला उत्तम प्रकाराचे प्रशिक्षण दिले."

गायनासोबत चित्रकला आणि नाटकाचीही आवड होती. मात्र, आईने "नाटक लग्नानंतर करता येणार नाही; पण गायन करता येईल," असा सल्ला दिला. त्यामुळे गायनाची साधना सुरु ठेवली. गुरुंनी रियाजाचे महत्त्व मनावर बिंबवले. "सहा तास सराव केला तरच तीन तास व्यवस्थित गाता येते," हा गुरुंचा मंत्र आयुष्यभर उपयोगी पडल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी आवडती बंदिश 'लाज शरम तो को नाही...' सादर केली. बंदिशीतील शब्द स्पष्ट असणे, सूर-तालाची जाण आणि बारकाव्यांवर लक्ष देणे यांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. गुरुंनी गायनासोबत तबलाही शिकवला. "सूर आणि ताल हे एकत्र असतात. मात्र, आजच्या संगीतात त्यांच्यातील हा समतोल वेगळा जाणवतो," अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

नव्या पिढीतील गायिकांना मार्गदर्शन करण्यासाठी आपण 'पलट्या' हे यूट्यूब चॅनेल सुरु केल्याचे त्यांनी सांगितले.

वयाच्या 16व्या वर्षी संगीत मैफलींना सुरुवात झाली. पुण्यात आल्यानंतर जानुरीकर सरांकडे संगीताचे शिक्षण घेतले. त्यांनी गायन ऐकून सवाई गंधर्व महोत्सवात गाण्याची संधी मिळावी यासाठी पंडित भीमसेन जोशी यांच्याकडे नेण्याचे सांगितले होते. मात्र, पुढील काळात दोन मुलींच्या बाळंतपणामुळे पुढे गायनाला पुरेसा वेळ देता आला नाही. त्यानंतर वाटवे अण्णांकडे सुगम संगीताचे शिक्षण घेतले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये स्वतंत्र सहकार न्यायालय सुरु करण्याची मागणी

## विधी समितीच्या सभापती सुजाता बोराटे यांचे आयुक्तांना निवेदन

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी-चिंचवड : शहरातील सहकारी संस्था आणि सभासदांशी संबंधित वादांचा स्थानिक पातळीवर जलद निपटारा व्हावा, यासाठी पिंपरी-चिंचवड शहरात स्वतंत्र सहकार न्यायालय सुरु करण्यात यावे, अशी मागणी महापालिकेच्या विधी समितीच्या सभापती सुजाता निलेश बोराटे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची भेट घेऊन निवेदन दिले असून, शासनाच्या सहकार विभागाकडे ही मागणी पाठविण्याची विनंती केली आहे.**




पिंपरी-चिंचवड शहराचा झपाट्याने विस्तार होत असून शहरात सहकारी संस्थांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शहरामध्ये सुमारे 37 हजारांहून अधिक सहकारी संस्था कार्यरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या संस्थांमध्ये सभासदांचे हक्क, संस्थेचे व्यवस्थापन, पदाधिकारी, प्राधिकरण तसेच आर्थिक व्यवहारांशी संबंधित विविध प्रकारचे वाद निर्माण होत असतात.

सध्या सहकारी संस्थांशी संबंधित अनेक प्रकरणांसाठी नागरिकांना पुणे येथील सहकार न्यायालयात जावे लागते. त्यामुळे शहरातील नागरिकांचा वेळ आणि पैसा खर्च होतो. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच सर्वसामान्य सभासदांना वारंवार पुण्यात हेलपाटे मारावे लागत असल्याने त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या, सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्या आणि विविध संस्थांमधील सभासदांच्या वाढत्या तक्रारी लक्षात घेता, स्वतंत्र सहकार न्यायालयाची गरज निर्माण झाली आहे. सहकारी संस्थांशी संबंधित न्यायालयीन प्रकरणांचा वाढता व्याप लक्षात घेता शहरातच न्यायव्यवस्था उपलब्ध झाल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो.

स्वतंत्र सहकार न्यायालयासाठी आवश्यक जागा, कार्यालयीन सुविधा, मनुष्यबळ आणि इतर पायाभूत सुविधा महापालिकेच्या माध्यमातून उपलब्ध करून देता येतील. त्यामुळे शासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करुन पिंपरी-चिंचवडमध्ये स्वतंत्र सहकार न्यायालय सुरु करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी बोराटे यांनी केली आहे.

महापालिकेने विधी समितीच्या माध्यमातून या विषयाचा प्रस्ताव तयार करून राज्य शासनाच्या सहकार विभागाकडे पाठवावा, अशी विनंतीही करण्यात आली आहे.

"पिंपरी-चिंचवड शहरात हजारो सहकारी संस्था कार्यरत असून त्यांच्या सभासदांना संबंधित प्रकरणांसाठी पुण्यात जावे लागते. यामध्ये सर्वसामान्य सभासद, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांचा वेळ, पैसा व श्रम खर्च होतात. शहराची वाढती लोकसंख्या आणि सहकारी संस्थांची संख्या लक्षात घेता स्वतंत्र सहकार न्यायालय सुरु करणे ही काळाची गरज आहे. नागरिकांना जलद, सुलभ आणि स्थानिक पातळीवर न्याय मिळावा, यासाठी महापालिकेने तातडीने प्रस्ताव तयार करुन राज्य शासनाकडे पाठवावा."

- सुजाता निलेश बोराटे

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968